**<u>रे.दि.मु.नं. ४९५/२०१८</u>**

## निशाणी ३१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ७ प्रमाणे दावा मिळकतीची पाहणी करण्यासाठी वरिष्ठ वकिलांची नियुक्ती करुन अहवाल सादर करणेसाठी केला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मिळणेसाठी केला असून, दावा मिळकती खरेदीखताचे वेळी जिरायत होत्या. त्यानंतर वादीने सदर मिळकतीमध्ये बांध बंधारे घालून सुधारणा केली. राहण्यासाठी तीन पत्र्याच्या खोल्या व व्हरांडा तसेच जनावरांसाठी पूर्व–पश्चिम १२५ फूट व दक्षिणोत्तर ३० फूट रुंद अशा मापाचे पत्रा शेड बांधले आहे. त्यामध्ये एकूण दहा बोअरवेल खोदल्या. त्यापैकी तीन बोअरवेल चालू आहेत. दावा कलम १(अ) मिळकत संपूर्ण बागायत केली असून, त्यामध्ये डाळिंब, मका अशी पिके आहेत. त्यासाठी वादीने तेरा लाख रुपये खर्च केला आहे. सदर मिळकतीमध्ये दोन लाख रुपये खर्च करुन वादीने विहीर खोदली आहे. नि. ५ चे चौकशीपूर्वी या सर्व परिस्थितीची पाहणी होऊन, तसा अहवाल कोर्टात येणे आवश्यक आहे. कारण प्रतिवादीने या सर्व बाबीं नाकारल्या आहेत. त्यासाठी सक्षम इसमाची किंवा वरिष्ठ वकिलांची नेमणूक होऊन त्यांनी दावा मिळकतीत प्रत्यक्ष जाऊन त्या मिळकतीची व त्यात असणारे बांध–बंधारे, शेततळी, विहिरी, पाईपलाईन, निरनिराळ्या बागा व इतर सर्व परिस्थिती पाहून कच्चा हातनकाशासह अहवाल सादर करणेचा हुकूम व्हावा. त्यामुळे न्यायदानाच्या बाबतीत मदत होणार आहे.

२) सदरच्या अर्जावर प्रतिवादींतर्फे म्हणणे दिले आहे व अर्जातील कथन अमान्य केले आहेत. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार दाव्याचे कामकाज प्रलंबित करणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. वकील ही व्यक्ती तज्ञ नसल्यामुळे दावा मिळकतीत हद्दीखुणा सांगू शकत नाही. वादीची मागणी योग्य नाही. दावा मिळकती या प्रतिवादींच्या मालकी हक्क वहिवाटीच्या आहेत. वादी हे पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा अर्ज देत आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

३) सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा अर्ज व म्हणणे प्रमाणे युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी करता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीची हद्दीखुणा निश्चितीबाबत कोणतीही मागणी किंवा तक्रार नाही. तसेच, तज्ञ वकिलांची नियुक्ती केल्याने वादी कथन करत असलेल्या बाबी रेकॉर्डवर आल्यामुळे दावा मिळकतीमध्ये कोणाची मालकी वहिवाट किंवा कब्जेवहिवाट आहे, हे वकील सांगू शकत नाही. त्यामुळे, दोन्हीं पक्षकारांमधील वादाचा मुद्दा निर्गत होणेस मदत होणार नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्ज मंजूर करणे योग्य वाटत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करणेत येतो.

**<u>आदेश</u>**

१) अर्ज नि. ३१ नामंजूर करणेत येतो.

सांगोला
दिनांक – २६/०९/२०१९

( सौ. एस. के. देशमुख )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. सतर,
सांगोला.